लघुलेखक भरती प्रक्रियेला विलंब; सुशिक्षित बेरोजगारांमध्ये संतापाची लाट

बीड, दि. १४ : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या मुंबई क्षेत्रातील लघुलेखक पदांच्या भरतीला चार वर्षांहून अधिक काळ लोटल्याने परीक्षार्थींमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. बीड जिल्ह्यातील परीक्षार्थी हतबल झाले आहेत. २०१९ नंतर नियमितपणे २०२५ मध्ये अपेक्षित असलेली जाहिरात मार्च २०२६ संपले तरी प्रसिद्ध न झाल्याने हजारो तरुणांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. अनेक विद्यार्थ्यांची वयोमर्यादा संपत चालली असून, रात्रंदिवस परिश्रम करूनही नोकरीची संधी मिळत नसल्याने हतबलता व्यक्त केली जात आहे. ३० पेक्षा अधिक आमदारांनी मुख्यमंत्र्यांना पत्र देऊनही प्रशासकीय स्तरावर अद्याप कोणतीही हालचाल झालेली नाही.

रोज वाचा दै. 'मुंबई लक्षदीप'

जाहीर सूचना

श्री. गिरधरलाल व्ही. शाह हे दिनानाथ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., एम.जी. रोड, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथील जागेचे सदस्य आहेत आणि सोसायटीमधील फ्लॅट क्र.११ चे संयुक्त धारक (श्री. राजकुमार गिरधरलाल शाह यांच्यासह) आहेत, यांचे २८.०४.१९९७ रोजी निधन झाले.

श्री. राजकुमार गिरधरलाल शाह हे मयत सदस्याचे कायदेशीर वारसदार असल्याने, त्यांनी सोसायटीकडे सदर फ्लॅट क्र.११ आणि त्यातील संबंधित हक्क, मालकी हक्क आणि हितसंबंध त्यांच्या एकमेव नावाने हस्तांतरित/प्रसारित करण्यासाठी अर्ज केला आहे, जो इतर कायदेशीर वारसदारांनी केलेल्या रीतसर नोंदणीकृत मुक्तता करारनामाच्या आधारे आहे.

जर कोणा व्यक्तीस, वारसदार किंवा अन्य दावेदार/आक्षेपकर्ता, सोसायटी, न्यास, बँक, एनबीएफसी, एचयुएफ, कायदेशीर वारसदार, वित्तीय संस्था यांना उपरोक्त फ्लॅट मालमत्ता किंवा भागावर विक्री, अदलाबदल, वारसाहक्क, कायदेशीर हक्क, जप्ती, लिस पेन्डन्स, तारण, भागीदारी, कोणतेही इतर हुकूमनामा, कायद्याच्या न्यायालय, न्यायाधिकरण, महसूल किंवा वैधानिक प्राधिकरणाद्वारे पारित आदेश किंवा प्रदानता किंवा लवाद किंवा ताबा किंवा अन्य इतर प्रकारे कोणताही अधिकार, हक्क, दावा किंवा आक्षेप असल्यास त्यांनी सर्व पृष्ठ्यर्थ सत्य दस्तावेज व आवश्यक पुराव्यांसह लेखी स्वरुपात सदर सूचना प्रकाशनापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील स्वाक्षरीकर्ता हेतल एच. मजिठीया, वकील, उच्च न्यायालय, दी लिगल सोल्युशन्झ+ डी-१०३/१०४, अंबिका दर्शन, सी. पी. रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई-४००१०१ यांच्याकडे कळवावे. अन्यथा असे दावे किंवा आक्षेप असल्यास ते सोडून दिले आहेत असे समजण्यात येईल आणि आमच्या अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत आणि सर्व अधिभारापासून मुक्त व स्पष्ट बाजारभाव असलेल्या सदर अनुसुचीत मालमत्तेच्या अधिकाराच्या आधारावर व्यवहार सुरू करतील.

दी लिगल सोल्युशन्झ+करिता
सही/-
ॲड. हेतल एच. मजिठीया
भागीदार

दिनांक: १४.०४.२०२६, ठिकाण: मुंबई

नमुना क्र.आयएनसी-२६

(कंपनी (स्थापना) अधिनियम, २०१४ चे नियम ३० नुसार)

केंद्र शासन, क्षेत्रिय संचालक, पश्चिम क्षेत्र १, मुंबई यांच्या समक्ष

कंपनी कायदा २०१३ चे कलम १३ चे उपकलम (४) आणि कंपनी (स्थापना) अधिनियम २०१४ चे नियम ३० चे नियम (५) चे खंड (अ) प्रकरणात

आणि

डॉटमॉन्क प्रायव्हेट लिमिटेड

(सीआयएन:युद२०९९एमएच२०२५पीटीसी४३९७६६) यांचे नोंदणीकृत कार्यालय: वीवर्क २४७ पार्क, १३वा मजला, विक्रोळी कॉर्पोरेट पार्क, हिंदुस्तान सी बस स्टॉप, लाल बहादूर शास्त्री रोड, गांधी नगर, मुंबई, महाराष्ट्र-४०००८३.

...अर्जदार कंपनी/याचिकाकर्ता

सर्वसामान्य जनतेस येथे सूचना देण्यात येत आहे की, १८ मार्च, २०२६ रोजी झालेल्या अतिरिक्त विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर विशेष ठरावानुसार कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय महाराष्ट्र राज्यातून हरियाणा राज्यात स्थलांतरीत करण्याकरिता कंपनीचे मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशनचे बदलण्याच्या निश्चितीसाठी कंपनीद्वारे केंद्र शासन यांच्याकडे कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३ अंतर्गत अर्ज करण्याचे योजिले आहे.

कोणा व्यक्तिच्या हितास कंपनीचे नोंदणीकृत कार्यालयाच्या नियोजित बदलामुळे काही बाधा येत असल्यास त्यांनी त्यांच्या हिताचे स्वरूप व विरोधाचे कारण नमूद केलेल्या प्रतिज्ञापत्राद्वारे त्यांचे आक्षेप रजि. पोस्टाने किंवा गुंतवणूकदार तक्रार नमुना भरून एमसीए-२१ पोर्टल (www.mca.gov.in) वर सदर सूचना प्रकाशन तारखेपासून १४ दिवसांच्या आत क्षेत्रिय संचालक, पश्चिम क्षेत्र १ यांचा पत्ता: एव्हरेस्ट, ५वा मजला, १०० मरिन ड्राईव्ह, मुंबई-४००००२ या कार्यालयात पाठवावी तसेच एक प्रत अर्जदार कंपनीला खाली नमुद त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयात पाठवावे.

वीवर्क २४७ पार्क, १३वा मजला, विक्रोळी कॉर्पोरेट पार्क, हिंदुस्तान सी बस स्टॉप, लाल बहादूर शास्त्री रोड, गांधी नगर, मुंबई, महाराष्ट्र-४०००८३.

च्या वतीने व करिता
डॉटमॉन्क प्रायव्हेट लिमिटेड
सही/-
धीरज शूर
(संचालक)
डीआयएन:०२९७२०८३

दिनांक: १४.०४.२०२६। ठिकाण: मुंबई

जाहिर नोटीस

तमाम लोकांना या नोटीसीद्वारे जाहीर करण्यात येते की, श्री हरेशभाई (हरेशकुमार) अ.पाध्या हे त्यांच्या हयातीत सदनीका क्रं. ४०७ (२२५ चौ. फुट चटई क्षेत्रफळ) ४था मजला सुख शांती एस आर ऐ को. ऑप. हा.सो.ली. कस्तुरबा रोड क्रं.५. राय डोंगरी, बोरीवली (पुर्व), मुंबई-४०००६६, जी न.भू.क्र. ४२७, ४२९ गांव: कान्हेरी ता. बोरीवली, नोंदणीकृत जिल्हा व उपजिल्हा मुंबई शहर व मुंबई उपनगरे या सदनीकेचे मालक व रु.५०/- चे पाच शेअर्स कं. १७१ ते १७५ (दोन्ही मीळून), शेअर सर्टीफीकेट क्रं. ३५चे धारक होते

श्री हरेशभाई (हरेशकुमार) अ.पाध्या यांचे दिनांक ०३/०८/२०२१ रोजी सीध्धपुर, पाटण, गुजरात येथे निधन झाले असुन त्यांच्या इतर वारसांच्या संमतीने व परवानगीने व आदर्श उपविधीतील तरतुदीनुसार कार्यवाही करुन सदर सदनीका व शेअर सर्टीफीकेट त्यांची पत्नी श्रीमती मनीषा ह. पाध्या यांचे नावे हस्तांतरीत करण्यात आले व सध्या त्यांनी सदर सदनीका व शेअर विकण्याचे ठरवीले आहे.

सदर सदनीका व शेअर सर्टीफीकेट चे कोणाही व्यक्तीकडे विरुद्ध कब्जाने, वाटणी, गहाण, विक्री, देणगी, लीज, चार्ज, ट्रस्ट, लायसन्स, पोटगी, इजमेंट अथवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क असल्यास निम्नस्वाक्षरीकरांस त्यांच्या पत्यावर सदर नोटीस जाहीर झाल्यापासून पंधरा दिवसांचे आत कागदपत्रे/पुराव्यासह लेखी कळवावे/सादर करावे, तसे न केल्यास सदर मिळकतीमधील अशा प्रकारचे हक्क विचारात न घेता व इतर एखादा हक्क असल्यास तो रद्दबातल झाला आहे किंवा असल्यास जाणीपूर्वक सोडून दिला आहे असे समजून सदर सदनीका व शेअर सर्टीफीकेट सर्व बोजाविरहीत आहे असे समजण्यात येईल, मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही.

सही/-
श्री. ज्ञानेश सं.भातखंडे
वकील उच्च न्यायालय,
१, कोटुसींग चाळ, रॉयल गार्डन बिल्डींग शेजारी कस्तुरबा छेद मार्ग, क्र.२, बोरीवली (पूर्व),मुंबई-४०००६६.

ठिकाण : मुंबई दिनांक :१५/०४/२०२५

डेन नेटवर्क्स लिमिटेड

सीआयएन: एल९२४९०एमएच२००७पीएलसी३४४७६५

नोंदणीकृत कार्यालय: युनिट क्र.११६, १ला मजला, सी विंग, इमारत क्र.२, कैलास इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, एल.बी.एस. मार्ग, पार्क साईट, विक्रोळी (प.), मुंबई-४०००७९, महाराष्ट्र, भारत. दूर.क्र:+९१-२२-२५१७०१७८, वेबसाईट: www.dennetworks.com, ई-मेल: investorrelations@denonline.in

३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या तिमाही व वर्षाकरिता लेखापरिक्षित एकत्रित वित्तीय निष्कर्षाचा अहवाल

(रु. दशलक्ष, प्रती शेअर डाटा व्यतिरिक्त)

	तपशील	संपलेली तिमाही			संपलेले वर्ष	
		३१.०३.२०२६ (लेखापरिक्षित)	३१.१२.२०२५ (अलेखापरिक्षित)	३१.०३.२०२५ (लेखापरिक्षित)	३१.०३.२०२६ (लेखापरिक्षित)	३१.०३.२०२५ (लेखापरिक्षित)
१.	कार्यचलनातून एकूण उत्पन्न	२४०५.७१	२५१०.१०	२४८०.९६	९७४२.८०	१००५४.०८
२.	कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा विशेष साधारण बाबपूर्व)	४९२.३७	४७९.३८	६८७.३२	२०८१.१५	२४८५.६२
३.	करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा विशेष साधारण बाबनंतर)	४९२.३७	४७९.३८	६८७.३२	२०८१.१५	२४८५.६२
४.	करानंतर कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा विशेष साधारण बाबनंतर)	३६४.२९	४०३.८५	५९८.६१	१६५६.२५	१९६७.३०
५.	कालावधीकरिता एकूण सर्वकष उत्पन्न (कालावधीकरिता एकत्रित नफा/(तोटा) (करानंतर) आणि इतर सर्वंकष उत्पन्न (करानंतर))	३५८.७५	४११.५१	६०१.९५	१६५९.८९	१९७३.९५
६.	भरणा केलेले समभाग भांडवल (निव्वळ)	४७६७.६६	४७६७.६६	४७६७.६६	४७६७.६६	४७६७.६६
७.	राखीव (मागील वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदपत्रकात दिल्याप्रमाणे पुनर्मुल्यांकित राखीव वगळून)				३३०८०.४२	३१४२७.९९
८.	उत्पन्न प्रतिभाग (दर्शनी मूल्य रु.१०/- प्रत्येकी)					
	१. मूळ	०.८१*	०.८०*	१.३०*	३.४८	४.२०
	२. सौमिकृत	०.८१*	०.८०*	१.३०*	३.४८	४.२०
	*वार्षिकीकरण नाही					

एकत्रित वित्तीय निष्कर्षाचे टीप:

१. सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अ‍ॅन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट) रेग्युलेशन २०१५ च्या नियम ३३ अन्वये स्टॉक एक्सचेंजसह सादर करण्यात आलेली त्रैमासिक व वार्षिक वित्तीय निष्कर्षाचे सविस्तर नमुन्यातील उतारा आहे. संपलेल्या त्रैमासिक व वार्षिक वित्तीय निष्कर्षाचे संपूर्ण नमुना कंपनीच्या www.dennetworks.com आणि स्टॉक एक्सचेंजच्या (www.bseindia.com/nseindia.com) वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदर अहवाल जोडलेल्या क्युआर कोड मार्फत पाहता येईल.

२. त्रैमासिक व वार्षिक वित्तीय निष्कर्षाचे लेखासमितीद्वारे पुनर्विलोकन करण्यात आले आणि १४ एप्रिल, २०२६ रोजी झालेल्या सभेत संचालक मंडळाद्वारे नोंदपटावर घेण्यात आले.

३. एकमेव वित्तीय अहवालावरील कंपनीचे तपशील खालीलप्रमाणे:

QR Code

(रु. दशलक्ष)

तपशील	संपलेली तिमाही			संपलेले वर्ष	
	३१.०३.२०२६ (लेखापरिक्षित)	३१.१२.२०२५ (अलेखापरिक्षित)	३१.०३.२०२५ (लेखापरिक्षित)	३१.०३.२०२६ (लेखापरिक्षित)	३१.०३.२०२५ (लेखापरिक्षित)
कार्यचलनातून महसूल	२४९६.८५	२५७६.११	२४३५.६२	१०००९.१७	९८९१.४५
करपुर्व नफा	४४१.१५	२८७.२७	२७५.६८	१६३३.७८	१५८८.४७
करानंतर नफा	२८९.०६	१९८.९७	२३९.८९	१२२७.५३	११७३.९६

संचालक मंडळाच्या वतीने व करिता
डेन नेटवर्क्स लिमिटेड
सही/-
समीर मनचंदा
अध्यक्ष व अ-कार्यकारी संचालक
डीआयएन:०००१५४५९

ठिकाण: नवी दिल्ली
दिनांक: १४.०४.२०२६

जाहिर सूचना

सवसामा जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार श्री. चौहान महेंद्रकुमार महोबतसंगभाई यांनी दिनांक १३.०४.२०२६ रोजी सामंजस्य कराराद्वारे (MOU) सेंट सेबॅस्टियन होम्स को-सोसायटी कडून एक बंगल्याजा भूखंड खरेदी केली आहे.

मालमत्तेचे वेळापत्रक

सदर मालमत्ता रेबेलो रोड, सबर्बन स्कीम क्र. ८, वांद्रे पश्चिम, मुंबई-४०००५० येथे स्थित असून तिचे अधिक तपशीलवार वर्णन खालीलप्रमाणे आहेः "एकूण ६१३ चौरस यार्ड क्षेत्रफळाचे भूखंड, सर्वेक्षण क्रमांक बी/६८७, हे सर्व भूखंड क्रमांक ७८ सीटीएस क्रमांक बी/६८७ येथे स्थित असून, त्यासोबत असलेले सर्व हक्क, सुखाधिकार आणि संलग्न बाबी."

१९८१ च्या घोषणापत्रानुसार, श्रीमती व्हिक्टोरिया एल. फिलिप्स या या मालमत्तेच्या मालक होत्या आणि त्यांनी सोसायटी व त्यांच्या काळजीवाहकाला मालमत्तेची काळजी घेण्यासाठी आणि तिचा पुढील विकास करण्यासाठी किंवा ती विकण्यासाठी घोषणापत्र दिले होते. त्यानुसार, सेंट सबेस्टियन होम्स को-सोसायटी ही प्रहपर्टी कार्डवरील पुष्टी करणारी मालक आहे, जिचा माझे पक्षकार श्री. चौहान महेंद्रकुमार महोबतसंगभाई यांच्यासोबत सामंजस्य करार आहे. त्यामुळे, सर्व कागदपत्रे तपासल्यानंतर, माझ्या पक्षकाराने हा व्यवहार अंतिम केला आहे आणि मला असे वाटते की या मालमत्तेत कोणीही मालक नाही. म्हणूनच माझे पक्षकार हा व्यवहार अंतिम करत आहेत आणि लेखी नोटीस देत आहेत, जेणेकरून पुढील कोणताही कायदेशीर वाद निर्माण होणार नाही.

उपरोक्त सामंजस्य कराराच्या अनुषंगाने, सेंट सबेस्टियन होम्स को-सोसायटीने सदर बंगल्याच्या भूखंडावरील आपले सर्व हक्क, मालकी आणि हितसंबंध माझे पक्षकार श्री. चौहान महेंद्रकुमार महोबतसंगभाई यांच्या नावे हस्तांतरित करण्यास सहमती दर्शवली आहे आणि त्यावरील हक्क सोडून दिले आहेत, त्यामुळे आता ते त्यातील सर्व मालकी हक्कांचे अधिकारदार आहेत.

सदर मालमत्तेच्या संबंधात कोणत्याही स्वरूपाचा दावा, हक्क, मालकी, हितसंबंध, धारणाधिकार, बोजा किंवा आक्षेप असलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना, ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत, कागदोपत्री पुराव्यासह ते लेखी स्वरूपात सादर करण्याचे आवाहन याद्वारे करण्यात येत आहे, असे करण्यात अयशस्वी झाल्यास, असे दावे सोडून दिलेले आहेत असे मानले जाईल आणि त्यानंतर त्यांचा विचार केला जाणार नाही.

ही सूचना सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी जारी करण्यात आली आहे.

ॲडव्होकेट अजय कुमार डी काकडिया
कार्यालयाचा पत्ताः २६१ राज इम्पेरिया, विराई चौक, सार्थना, सुरत-३९५०१३, गुजरात.
संपर्कः ९७२६०३९५५९ / ७६००६६१८७३

ठिकाणः मुंबई दिनांकः १५/०४/२०२६

जाहीर सूचना

याद्वारे अशी सूचना देण्यात येते की, श्री. भारत शांतिलाल नागरशेठ हे हस्तगिरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, ए. सी. रोड, अशोक नगर, कांदिवली (पूर्व), मुंबई-४००१०१ या सोसायटीचे सदस्य आहेत आणि सासेायटीच्या इमारतीमधील फ्लॅट क्र.बी/५०७ चे धारक आहेत, यांचे दिनांक २३.०१.२०२६ रोजी निधन झाले आहे. सदर मयत सदस्याचे कायदेशीर वारसदार श्री. भारत शांतिलाल नागरशेठ यांनी सदर फ्लॅटच्या संदर्भात सोसायटीच्या सदस्यत्वाकरिता अर्ज केला आहे.

सोसायटी याद्वारे, सदर मयत सदस्याचे सोसायटीच्या भांडवलातील/मालमत्तेतील समभाग आणि हितसंबंध हस्तांतरित करून सदर फ्लॅट क्र.बी/५०७ हे श्रीमती प्रियांका भारत नागरशेठ यांच्या नावे हस्तांतरित करण्याच्या उद्देशाने वारसदार किंवा इतर दावेदार/आक्षेपदार यांच्याकडून दावे आणि आक्षेप आमंत्रित करत आहे. हे दावे/आक्षेप या सूचनेच्या प्रकाशनापासून १५ दिवसांच्या कालावधीत सादर करावेत. तसेच संस्थेच्या उपविधींमध्ये नमूद केल्यानुसार मयत सदस्याचे समभाग आणि हितसंबंध हस्तांतरित करण्याच्या दाव्यांच्या/आक्षेपांच्या पुष्टयर्थ आवश्यक कागदपत्रांच्या किंवा पुराव्यांच्या प्रती सोबत जोडणे अनिवार्य आहे.

सोसायटीच्या भांडवलातील/मालमत्तेतील मयत सदस्याचे समभाग आणि हितसंबंध हस्तांतरित करण्याबाबत सोसायटीकडे प्राप्त झालेले कोणतेही दावे/आक्षेप सोसायटीच्या उपविधींमध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार हाताळले जातील. सोसायटीच्या नोंदणीकृत उपविधींची प्रत, दावेदार/आक्षेपदार यांना तपासणीकरिता या सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून ते विहित कालावधी संपेपर्यंतच्या तारखेपर्यंत, कार्यालयीन वेळेत संस्थेच्या कार्यालयात किंवा सोसायटीच्या सचिवांकडे उपलब्ध असेल.

हस्तगिरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, ए. सी. रोड, अशोक नगर, कांदिवली (पूर्व), मुंबई-४००१०१.

ठिकाण: मुंबई
दिनांक: १५.०४.२०२६

हस्तगिरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, (सचिव)

फर्व्हेंट सिनर्जीज लिमिटेड

बी-७/८, सत्यम शॉपिंग सेंटर, एम.जी. रोड, घाटकोपर पूर्व, मुंबई, महाराष्ट्र-४०००७७.

सीआयएन: एल२४२३९एमएच२००९पीएलसी१९३८४३

कंपनीच्या सदस्यांसाठी सूचना

सभासदांना याद्वारे कळविण्यात येते की, सहकार मंत्रालयाने जारी केलेल्या परिपत्रकांनुसार, सदर सूचनेमध्ये नमूद केलेल्या ठरावासाठी त्यांची मंजुरी मागवणारी टपाल मतपत्रिका सूचना, त्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवण्यात आली आहे, ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी/डिपॉझिटरीज/रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट (आरटीए) - एमयूएफजी ईनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडे नोंदणीकृत आहेत आणि ज्यांची नावे शुक्रवार, १० एप्रिल, २०२६ (कट-ऑफ तारीख) रोजी सभासदांच्या नोंदवही/लाभधारक मालकांच्या यादीमध्ये आहेत. सूचनेचे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवणे १३ एप्रिल, २०२६ रोजी पूर्ण झाले आहे. ही सूचना कंपनीच्या https://www.ferventsynergies.com/ या वेबसाइटवर, स्टॉक एक्सचेंज म्हणजेच बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com या वेबसाइटवर, एमयूएफजी इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एमयूएफजी) च्या https://in.mpms.mufg.com/ या वेबसाइटवर आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) च्या www.evoting.nsdl.com या वेबसाइटवर देखील उपलब्ध आहे.

या पोस्टल बॅलेटसाठी सदस्यांना सूचनेची छापील प्रत, पोस्टल बॅलेट फॉर्म आणि प्रीपेड उत्तर लिफाफा पाठवला जात नाही. सदस्यांनी आपली संमती किंवा असहमती केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे (रिमोट ई-व्होटिंग) मतदान करून पोस्टल बॅलेटद्वारे कळवणे आवश्यक आहे.

ई-व्होटिंगचा तपशील:

अ) कंपनीने एनएसडीएलद्वारे प्रदान केलेल्या ई-व्होटिंग प्लॅटफॉर्मद्वारे आपल्या सर्व सदस्यांना रिमोट ई-व्होटिंगची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

ब) दूरस्थ ई-मतदान सुविधा गुरुवार, १६ एप्रिल, २०२६ रोजी स.९.००वा. (भाप्रवे) सुरू होईल आणि शुक्रवार, १५ मे, २०२६ रोजी सायं.५.००वा. (भाप्रवे) समाप्त होईल. नमूद केलेल्या तारखे आणि वेळेनंतर ई-मतदानास परवानगी दिली जाणार नाही.

क) केवळ तेच सदस्य ज्यांची नावे कट-ऑफ तारखेपर्यंत डिपॉझिटरीद्वारे ठेवलेल्या सदस्य नोंदणी पुस्तिकेत किंवा लाभधारक मालकांच्या नोंदणी पुस्तिकेत आहेत, तेच दूरस्थ ई-मतदान प्रक्रियेद्वारे मतदान करण्यास पात्र आहेत.

ड) जी व्यक्ती कट-ऑफ तारखेपर्यंत सदस्य नाही, तिला विनंती आहे की ही सूचना केवळ माहितीच्या उद्देशाने समजावी.

इ) दूरस्थ ई-मतदान प्रक्रियेसंबंधी सूचना, ज्यामध्ये प्रत्यक्ष किंवा डिमॅट स्वरूपात शेअर्स धारण करणारे सदस्य दूरस्थ ई-मतदानाद्वारे आपले मत कसे देऊ शकतात, याचा समावेश आहे, त्या सूचनेत दिलेल्या आहेत.

ई-मेल पत्ता नोंदणी/अद्ययावत करण्याची पद्धत:

अ) ज्या सदस्यांकडे भौतिक स्वरूपात शेअर्स आहेत आणि ज्यांनी कंपनी/एमयूएफजी इंटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडकडे त्यांच्या ई-मेल पत्त्यांची नोंदणी केलेली नाही, ते https://web.in.mpms.mufg.com/EmailReg/Email_Register.html या लिंकला भेट देऊन त्यांच्या ई-मेल पत्त्यांची नोंदणी करू शकतात.

ब) ज्या सदस्यांकडे डिमॅट स्वरूपात शेअर्स आहेत आणि ज्यांनी त्यांच्या ई-मेल पत्त्याची नोंदणी/अद्ययावत केलेली नाही, त्यांना विनंती आहे की त्यांनी ज्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे त्यांची डिमॅट खाती आहेत, त्यांच्याकडे त्यांच्या ई-मेल पत्त्याची नोंदणी/अद्ययावत करावी.

दूरस्थ ई-मतदानाद्वारे झालेल्या पोस्टल बॅलेटचा निकाल १५ मे, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी जाहीर केला जाईल आणि तो कंपनीच्या वेबसाइटवर ठेवला जाईल, तसेच बीएसई आणि एनएसडीएल यांना त्यांच्या संबंधित वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यासाठी कळवले जाईल.

काही शंका असल्यास, आपण www.evoting.nsdl.com च्या डाउनलोड विभागात उपलब्ध असलेले भागधारकांसाठीचे 'एफएक्युज' आणि भागधारकांसाठीचे ई-व्होटिंग वापरकर्ता मॅन्युअल पाहू शकता किंवा एनएसडीएल (पत्ता: टाइम्स टॉवर, १ला मजला, कमला मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई-४०००१३) येथे टोल फ्री क्र.: १८०० १०२० ९९० / १८०० २२४ ४३० वर संपर्क साधा किंवा evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवा.

फर्व्हेंट सिनर्जीज लिमिटेडकरिता
सही/-
संजय ठक्कर
व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन: ००५८८४२०)

दिनांक: १४.०४.२०२६
ठिकाण: मुंबई

बजाज हौसिंग फायनान्स लिमिटेड

BAJAJ HOUSING FINANCE

कॉर्पोरेट कार्यालय: सिरेब्रम आयटी पार्क बी२ इमारत, ५वा मजला, कल्याणी नगर, पुणे, महाराष्ट्र-४११०१४. शाखा कार्यालय: ७वा मजला, सुमेर प्लाझा, युनिट क्र.७०२, मरोळ मरोशी रोड, संकष्ट पाडा वेलफेअर सोसायटी, मरोळ, अंधेरी पूर्व, मुंबई, महाराष्ट्र-४०००५९, भारत.

ताबा सूचना

सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेटस् अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ चे कलम १३(४) अन्वये सूचना. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रूल्स, २००२ च्या नियम ८(१) (परिशिष्ट-४)

ज्याअर्थी, खालील स्वाक्षरीकर्ता हे सिक्युरीटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल असेटस् अ‍ॅन्ड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत मे. बजाज हौसिंग फायनान्स लिमिटेड (बीएचएफएल) चे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सहवाचिता कलम १३(२) अन्वये असलेल्या अधिकाराअंतर्गत त्यांनी खाली नमूद केलेल्या कर्जदार/सहकर्जदार/जामिनदारांवर मागणी सूचना बजावली होती आणि सदर सूचना प्राप्त तारखेपासून ६० दिवसांच्या आत सूचनेत नमूद रक्कम जमा करण्यास सांगण्यात आले होते. कर्जदार/सहकर्जदार/जामिनदार हे वर नमूद केलेली रक्कम भरण्यास असमर्थ ठरले असून कर्जदार/सहकर्जदार/जामिनदार व सर्वसामान्य जनतेस येथे सूचित करण्यात येत आहे की, मे. बजाज हौसिंग फायनान्स लिमिटेडच्या वतीने खालील स्वाक्षरीकर्त्यांनी सदर कायद्याच्या कलम १३(४) सहवाचिता सदर अधिनियमाच्या नियम ८(१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकाराअंतर्गत खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा ताबा खाली नमूद केलेल्या तारखेला घेतलेला आहे. विशेषतः कर्जदार/सहकर्जदार/जामिनदार व सर्वसामान्य जनतेस येथे सावध करण्यात येते की, सदर मालमत्तेसह कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मालमत्तेसह व्यवहार केलेला असल्यास त्यांनी बीएचएफएलकडे मालमत्तेसह केलेले उपरोक्त रक्कम आणि त्यावरील व्याज जमा करावे.

कर्जदार/जामिनदाराचे नाव (एलएएन क्र., शाखा नाव)	प्रतिभूत मालमत्तेचे वर्णन (स्थावर मालमत्ता)	मागणी सूचना दिनांक व रक्कम	ताबा दिनांक
शाखा: मुंबई (कर्ज क्र.: एच४०५एचएलडी०१४०८२१ आणि एच४०५एचएलटी०१६६६२६) १. ज्योती प्रकाश आहुजा (कर्जदार), पत्ता: फ्लॅट क्र.२१, २रा मजला, गौतम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, जुहू रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र-४०००५४.	पुढे नमुद बिगर-शेत मालमत्तेचे सर्व भाग व खंड: फ्लॅट क्र.२१, २रा मजला, गौतम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, जुहू रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र-४०००५४.	२८ मे, २०२४ रोजी रु.३,७९,५३,३२५/- (रुपये तीन कोटी एकोणऐंशी लाख त्रेपन्न हजार तिनशे पंचवीस फक्त)	१०.०४.२०२६
२. प्रकाश दामोदर आहुजा (सह-कर्जदार), पत्ता: फ्लॅट क्र.२१, २रा मजला, गौतम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, जुहू रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र-४०००५४.			
शाखा: मुंबई (कर्ज क्र.: एच४०५एचएलपी१०३७८६४) १. टिम्ब्रेसोनिक लाइफस्टाइल प्रायव्हेट लिमिटेड (मालक/प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता/व्यवस्थापकीय संचालक) (कर्जदार), पत्ता: लोधा सुप्रिमस ऑफिस क्र.१००९, १९वा मजला, लोधा सुप्रिम, साकी विहार रोड, मुंबई, महाराष्ट्र-४०००७२.	पुढे नमुद बिगर-शेत मालमत्तेचे सर्व भाग व खंड: फ्लॅट क्र.५०३, ०५वा मजला, क्षेत्रफळ ८५० चौ.फु. बिल्टअप क्षेत्र, प्रभुदर्शन जैन मंदिर कोहौसोलि., प्लॉट जागा सीटीएस क्र.१३/ए, गाव बांदिवली डी, एस व्ही रोड, जोगेश्वरी पश्चिम, तालुका बोरिवली, जिल्हा मुंबई-४००१०२.	२१ जुलै, २०२५ रोजी रु.१,२८,९४,७०६/- (रुपये तीन कोटी अठ्ठावीस लाख चौऱ्याण्णव हजार सातशे सहा फक्त)	१०.०४.२०२६
२. विक्रांत विरेंद्र कुमार अग्रवाल (सह-कर्जदार), पत्ता: बी/३९०१, लोधा बेल्लीसिमो, एन एम जोशी मार्ग, महालक्ष्मी, अपोलो मिल कंपाऊंड, जेकब सर्कल, मुंबई, महाराष्ट्र-४०००११. ३. निशांत प्रदीप शर्मा (सह-कर्जदार), ४. शिल्पा प्रदीप शर्मा (सह-कर्जदार), ३ व ४ चा पत्ता: ए ५०३, प्रभुदर्शन जैन मंदिर सोसायटी, एस व्ही रोड, सिटी हॉस्पिटल समोर, जोगेश्वरी पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र-४००१०२. ५. विशाल किरण शर्मा (सह-कर्जदार), पत्ता: फ्लॅट क्र.१/३, वर्मा नगर, जुना नागरदास रोड, चिनाई कॉलेजच्या मागे, अंधेरी पुर्व, मुंबई-४०००६९.			

दिनांक: १५.०४.२०२६, ठिकाण: मुंबई — सही/- प्राधिकृत अधिकारी, बजाज हौसिंग फायनान्स लिमिटेड

जाहीर सूचना

सर्व जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, मी नटवरलाल एस. वाडिया-एचयूएफ आणि दमयंती एन. वाडिया यांच्या मालमत्तेच्या हक्काची तपासणी करत आहे; हे दोघेही फ्लॅट क्र.३०५-बी, ३रा मजला, विंग बी, सोसायटी/इमारत अर्थात पटेल सी.एच.एस. लिमिटेड, मिलन सबवे क्रॉस रोड, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई-४०००५६ येथील जागेचे संयुक्त आणि समान मालक व सदस्य आहेत. तसेच ते सदर सोसायटी अर्थात पटेल सी.एच.एस. लिमिटेडमध्ये भाग प्रमाणपत्र क्र.२१ अन्वये अनुक्रमांक १०१ ते १०५ (दोन्हीसह) असलेले ५ पूर्णपणे भरणा झालेले शेअर्स धारक आहेत.

जर कोणासही सदर संपूर्ण जमीन किंवा भागामधील उपरोक्त कायदेशीर वारसदारांचे संबंधित अविभाजीत शेअर्सबाबत विक्री, अदलाबदल, तारण, अधिभार, बक्षीस, विभागणी, मुक्तता, पारिवारीक व्यवस्था, न्यास, वारसाहक्क, ताबा, कायदेशीर हक्क, वहिवाट, कर्ज, भत्ता, प्राप्ती, भाडेपट्टा, मालकी हक्क, कोणत्याही कायद्याच्या न्यायालयाचे/न्यायाधिकरणाचे/महसूलाचे/वैधानिक प्राधिकरणाचे आदेश/हुकूमनामा किंवा अन्य इतर प्रकारे कोणताही अधिकार, हक्क, हित, दावा किंवा ताबा असल्यास त्यांनी लेखी स्वरुपात खालील स्वाक्षरीकर्त्याकडे सदर सूचनेच्या तारखेपासून ०७ दिवसात कळवावे. अन्यथा अशा व्यक्तींचे दावा त्याग केले आहेत असे समजले जाईल आणि उपरोक्त मालकांवर बंधनकारक असणार नाहीत आणि तद्नंतर सदर मालक हे सदर मालमत्ता किंवा भागाबाबत इच्छुक खरेदीदारासह व्यवहार करतील.

दिनांक: १५.०४.२०२६

सही/-
सोनल कोठारी, वकील
१, तळमजला, लि-मिडास, रामचंद्र लेन, मालाड (प), मुंबई-६४.
advsonalkothari12@gmail.com/९८२०३००११६

Niwas Housing Finance Limited

(Formerly known as Niwas Housing Finance Pvt Ltd.)

Regd. Office: - Unit No. 305, 3rd Floor, Wing 2/E, Corporate Avenue, Andheri- Ghatkopar Link Road, Chakala, Andheri (East), Mumbai – 400093

CIN : U65990MH2016PLC271587 Tel : +91 22 65202222

Email: connect@niwashfc.com; Website: www.niwashfc.com

NIWAS HOUSING FINANCE

सूचना

भारतीय रिझर्व्ह बँक (गृह वित्त कंपन्या) निर्देश, २०२५ नुसार याद्वारे सूचित करण्यात येते की, कंपनीचे युनिट क्र.५०५, ५वा मजला, आकृती स्टार, एमआयडीसी मेन रोड, चकाला, अंधेरी पुर्व, मुंबई, महाराष्ट्र-४०००९३ येथील शाखा कार्यालय अनपेक्षित परिस्थितीमुळे १६ जुलै, २०२६ पासून बंद करण्यात आले आहे. कोणत्याही मदतीसाठी, तुम्ही वर नमूद केलेल्या जवळच्या शाखा कार्यालयाशी संपर्क साधू शकता किंवा connect@niwashfc.com यावर ईमेल पाठवू शकता.

ही सूचना कंपनीच्या वेबसाईटवर www.niwashfc.com उपलब्ध आहे.

निवास हौसिंग फायनान्स लिमिटेडकरिता
(पूर्वीची निवास हौसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड)
सही/-
निधी सदानी
मुख्य सक्षम अधिकारी

दिनांक: १५.०४.२०२६

जाहीर सूचना

माझे अशील श्री. उज्वल वसंत बोरसे आणि त्यांची पत्नी श्रीमती काजल उज्वल बोरसे यांनी संयुक्तपणे श्री. वसंत नीलकंठ दात्ये यांच्याकडून दिनांक २८.०२.२००६ रोजीच्या विक्री करारनाम्यानुसार फ्लॅट क्र.१०४, क्षेत्रफळ अंदाजे ६०.८६ चौ.मी. बिल्टअप, १ला मजला, "श्री-निकेतन" बिल्डिंग म्हणून ज्ञात इमारत, भगत लेन, तैकलवाडी, माहीम, मुंबई-४०००१६, अंतिम प्लॉट क्र.१६२, टीपीएस ३, माहीम विभाग येथील जागा खरेदी केली, ज्याचे नोंदणी क्र.बीबीई-२/१८७६/२००६ अन्वये करण्यात आली होती (यापुढे सदर फ्लॅट म्हणून संदर्भ).

पुढे असे की, उपरोक्त फ्लॅटमध्ये ५०% अविभाजित हिस्सा धारण करणाऱ्या श्रीमती काजल उज्वल बोरसे यांचे मुंबई येथे दिनांक १२.११.२०२३ रोजी निधन झाले, त्यांच्या पश्चात खालीलप्रमाणे कायदेशीर वारसदार व उत्तराधिकारी आहेत:

अ.क्र.	नाव	मयताशी नाते
१.	श्री. उज्वल वसंत बोरसे	पती
२.	श्री. अर्जुन उज्वल बोरसे	मुलगा
३.	श्री. आरुष उज्वल बोरसे	मुलगा

वरील व्यतिरिक्त मृताचे इतर कोणतेही कायदेशीर वारसदार नाहीत. जर सदर फ्लॅटवर कोणताही हक्क सांगणारी कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तीसमूह किंवा कोणतीही वित्तीय संस्था असल्यास, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत मला लेखी कळवावे. वर नमूद केलेल्या कालावधीत कोणताही आक्षेप किंवा दावा प्राप्त न झाल्यास, असे मानले जाईल की सदर फ्लॅटचे इतर कोणीही कायदेशीर वारस किंवा दावेदार नाहीत.

आज दिनांकीत १५ एप्रिल, २०२६ रोजी

आर. आर. गुप्ता
वकील, उच्च न्यायालय
२रा मजला, लॉयर्स चेंबर, भास्कर इमारत,
ए.के. मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.

PDS — पीडीएस लिमिटेड

Global | Collaborative | Digital | Ethical

सीआयएन : L18101MH2011PLC388088

नोंदणीकृत व कॉर्पोरेट कार्यालय : युनिट क्र. ९७१, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी -घाटकोपर लिंक रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३, महाराष्ट्र, भारत.

ई-मेल : investors@pdsltd.com वेबसाइट : www.pdsltd.com दूर. : +९१ २२ ४१४४११००

भागधारकांना सूचना
कागदोपत्री स्वरूपातील सीक्युरिटीज्चे हस्तांतरण व डीम टेरियलायझेशनकरिता स्पेशल विन्डो

कंपनीच्या भागधारकांना याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, भारतीय प्रतिभूती व विमिय मंडळ (सेबी) यांनी त्यांचे परिपत्रक क्र. एचओ/ ३८/१३/११ (२) २०२६ -एमआयआरएसडी - पीओडी/आय/३७५०/२०२६, दि. ३०.०१.२०२६ अन्वये त्यांचे परिपत्रक क्र. सेबी/एचओ/एमयआयआरएसडी/एमआयआरएसडी - पीओडी/पी/सीआयआर/२०२५/९७, दि. ०२.०७.२०२५ अन्वये दि. ०७.०७.२०२५ ते दि. ०६.०१.२०२६ दरम्यान यापूर्वी प्राप्त सुविधांच्या अंतर्गत कागदोपत्री शेअर्सच्या हस्तांतरण विनंती पुन्हा दाखल करण्याकरिता दि. ०५.०२.२०२६ ते दि. ०४.०२.२०२७ या कालावधीकरिता स्पेशल विन्डो पुन्हा सुरू केली आहे.

सदर उपक्रमाअंतर्गत गत हस्तांतरण विनंतींचे नियमितीकरण करण्यासाठी खालील भागधारकांना संधी प्राप्त होत आहे :

अ) ज्या भागधारकांनी दि. ०१.०४.२०१९ पूर्वी कागदोपत्री शेअर्सची हस्तांतरण विनंती दाखल केली होती आणि दस्तावेजांतील कमतरता, प्रक्रियेतील अडचणी वा अन्य कारणास्तव त्या रद्द झाल्या होत्या/परत आल्या होत्या/दुर्लक्षित राहिल्या होत्या व यापूर्वी पुन्हा विनंती दाखल करता आली नव्हती.

ब) परिपत्रक दिनांक अर्थात दि. ३०.०१.२०२६ रोजीनुसार ज्या भागधारकांची हस्तांतरण विनंती कंपनी वा त्यांचे रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट (आरटीए) यांच्याकडे सध्या प्रलंबित आहे.

स्पेशल विन्डोअंतर्गत हस्तांतरण विनंती पुन्हा दाखल करण्यासाठी भागधारकांची पात्रता खालील निकषांनुसार पडताळून पाहता येईल:

हस्तांतरण विनंतीची अंमलबजावणी दिनांक	दि. ०१.०४.२०१९ पूर्वी हस्तांतरणाकरिता दाखल केली होती का?	मूळ सीक्युरिटी प्रमाणपत्र उपलब्ध आहे का?	विद्यमान विन्डोअंतर्गत दाखल करण्यास पात्र आहात का?
दि. ०१.०४.२०१९ पूर्वी	नाही (नवीन दाखल करण्यात येत आहे)	होय	✓
दि. ०१.०४.२०१९ पूर्वी	होय (रद्द झाली होती/परत आली होती)	होय	✓
दि. ०१.०४.२०१९ पूर्वी	होय	नाही	✗
दि. ०१.०४.२०१९ पूर्वी	नाही	नाही	✗

भागधारकांनी कृपया हस्तांतरण विनंती पुन्हा दाखल करण्यासाठी खालील प्रक्रियेचे पालन करावे :

पुन्हा दाखल करण्यासाठीची विनंती	दि. ०५.०२.२०२६ ते दि. ०४.०२.२०२७
पुन्हा दाखल करण्यासाठीची प्रक्रिया	सुधारित वा गहाळ तपशिलासमवेत मूळ हस्तांतरण दस्तावेज आमचे रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंट अर्थात एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड *(पूर्वीची लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड)* यांच्याकडे सादर करावी.
दस्तावेज पाठवण्याचे ठिकाण	युनिट - पीडीएस लिमिटेड एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) नोबल हाइट्स, १ ला मजला, प्लॉट एनएच २, सी - १, ब्लॉक एलएससी, सावित्री मार्केटजवळ, जनकपुरी, नवी दिल्ली - ११००५८.
कोणत्याही चौकशीकरिता	- हेल्पलाइन नं. : + ९१ ११ ४९४११००० - वेबसाइट : https://in.mpms.mufg.com/spclwindow.html - ई-मेल पत्ता : investor.helpdesk@in.mpms.mufg.com - विनंती पाठवण्याचा ई-मेल : https://web.in.mpms.mufg.com/helpdesk/Service_Request.html

भागधारकांना पुढे सूचित करण्यात येत आहे की, स्पेशल विन्डोअंतर्गत हस्तांतरित सीक्युरिटीज् या हस्तांतरण नोंदणीकरण दिनांकापासून एक वर्ष कालावधीकरिता लॉक इन असतील. सदर लॉक इन कालावधीदरम्यान सीक्युरिटीज् हस्तांतरित / धारण - चिन्हांकित /गहाण ठेवता येणार नाहीत.

पीडीएस लिमिटेड करिता
सही/-
अभिषेक कनोई
समूह विधि प्रमुख व कंपनी सचिव
आयसीएसआय सभासदत्व क्र. : एफसीएस ९५३०

दिनांक : १४ एप्रिल, २०२६
ठिकाण : मुंबई (भारत)

श्रीराम फायनान्स लिमिटेड

SHRIRAM Finance — SHRIRAM City MONEY WHEN YOU NEED IT MOST

मुख्य कार्यालय: लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, इस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१. दुर.:०२२-४२४१०४००, ०२२-४०६०३१००, वेबसाईट: http://www.shriramfinance.in. नोंदणीकृत कार्यालय: श्री टॉवर्स, प्लॉट क्र.१४ए, साउथ फेज, इंडस्ट्रियल इस्टेट, गुन्डी, चेन्नई-६०००३२. शाखा कार्यालय: सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, इमारत क्र.१०, ६वा मजला, गुरु हरगोविंदजी मार्ग, चकाला, अंधेरी पुर्व, मुंबई-४०००९३.

परिशिष्ट-४-ए (नियम ८(५) व ८(६) ९(१) ची तरतूद पहा) स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता लिलाव सूचना

एनसीएलटी, चेन्नईच्या आदेशानुसार श्रीराम सिटी युनियन फायनान्स लिमिटेड चे नाव श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स लिमिटेड मध्ये एकत्रीकरण करण्यात आले आहे, अशी माहिती देण्यात आली आहे. त्यानंतर दिनांक ३०.११.२०२२ रोजी पासून श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स लिमिटेड चे नाव श्रीराम फायनान्स लिमिटेड असे बदलण्यात आले. दिनांक ३०.११.२०२२ रोजी नाव बदलण्याच्या अनुषंगाने इन्कॉर्पोरेशनचे प्रमाणपत्र.

सिक्युरीटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल असेटस् अ‍ॅन्ड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट २००२ सहवाचिता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(५) व (६) व ९(१) च्या तरतुदीअन्वये स्थावर मालमत्तेचे विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनतेस व विशेषत: कर्जदार आणि जामिनदारांना येथे सूचना देण्यात येत आहे की, श्रीराम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम सिटी युनियन फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात) कडे तारण/अधिभारीत असलेल्या खाली नमुद केलेल्या स्थावर मालमत्तेचा वास्तविक ताबा श्रीराम फायनान्स लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली नमुद केलेले कर्जदार व जामिनदारांकडून श्रीराम फायनान्स लिमिटेड यांना देय असलेली खाली तक्त्यात नमुद रक्कम वसुलीकरिता खाली दिलेल्या तपशिलानुसार ई-लिलाव आधारावर जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे आणि जसे जेथे आहे या तत्त्वावर ०५.०५.२०२६ रोजी स.११.०० वा. ते दु.१.००वा. विक्री केली जाईल. कर्जदार, जामिनदार, देय रक्कम, स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन व ज्ञात अधिभार, ताबा प्रकार, आरक्षित मुल्य व इसारा रक्कम आणि वाढिव मुल्याचे तपशील खालीलप्रमाणे:

कर्जदार/सह-कर्जदार/जामिनदार/तारणकर्ताचे नाव	१३(२) मागणी सूचना तारीख व रक्कम	आरक्षित मुल्य (रु.) व बोली वाढविणे	इसारा रक्कम ठेव (इरठे) तपशील	लिलावाची तारीख व वेळ	संपर्क व्यक्ती व निरीक्षण तारीख
प्रदीप पंढरीनाथ शिंदे, फ्लॅट क्र.१, १ला मजला, निशिराज पॅलेस (गणाधिश), घर क्र.३०/१, गणाधिश भोर लेक, टिळक चौक, कल्याण (प.)-४२१३०१, जिल्हा ठाणे. प्रशांत पंढरीनाथ शिंदे, फ्लॅट क्र.२, २रा मजला, निशिराज पॅलेस (गणाधिश), घर क्र.३०/१, गणाधिश भोर लेक, टिळक चौक, कल्याण (प.)-४२१३०१, जिल्हा ठाणे. पंढरीनाथ गोविंद शिंदे, फ्लॅट क्र.१, १ला मजला, निशिराज पॅलेस (गणाधिश), घर क्र.३०/१, गणाधिश भोर लेक, टिळक चौक, कल्याण (प.)-४२१३०१, जिल्हा ठाणे. निर्मला पंढरीनाथ शिंदे, फ्लॅट क्र.२, २रा मजला, निशिराज पॅलेस (गणाधिश), घर क्र.३०/१, गणाधिश भोर लेक, टिळक चौक, कल्याण (प.)-४२१३०१, जिल्हा ठाणे. **ताबा दिनांक व ताबाचा प्रकार:** १०.१२.२०२४ - वास्तविक ताबा **ज्ञात अधिभार:** अज्ञात	दिनांक ०६.०५.२०२१ रोजी लवाद निर्णयानुसार रक्कम रु.१,१३,९८,९५०/- (रुपये एक कोटी तेरा लाख अठ्ठ्याण्णव हजार नऊशे पन्नास फक्त) आणि वर नमुद कर्ज करारनामाच्या नियम व अटीनुसार शुल्क आणि पुढील व्याज. ग्राहक आयडी पी०६३७५०९, कर्ज करारनामा सीडीबीडीआरटीएफ १६०४११००१०	रु.७३,००,०००/- बोली वाढविणे रु.२५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) आणि अधिकाधिक आणि अधिकाधिक **इसारा रक्कम ठेव (इरठे)(रु.)** रु.७,३०,०००/- इरठे सादर करण्याची अंतिम तारीख: ०४.०५.२०२६ वेळ: स.१०.०० ते दु.५.०० वा.	श्रीराम फायनान्स लिमिटेडच्या नावे इरठे रक्कम खाली नमुद तपशिलानुसार खात्यात आरटीजीएस/एनईएफटी करावे: बँकेचे नाव: एक्सिस बँक लिमिटेड. शाखा: डॉ. राधाकृष्णन सलाई मायलापुर, चेन्नई-६००००४. बँक खाते क्र.: चालु खाते क्र. ००६०१०२०००६७४४९ आयएफएससी: युटीआयबी००००००६	०५ मे, २०२६ वेळ: स.११.०० ते दु.१.०० वा.	सुहास ओहल ९६९९९०५२२२ मिलींद बालाजीवाले ९८२१११४३८२ मालमत्ता निरीक्षण दिनांक: ०२.०५.२०२६ रोजी स.११.००वा. ते दु.२.००वा.

मालमत्तेचे वर्णन

फ्लॅट क्र.१, १ला मजला, निशिराज पॅलेस (गणाधिश), घर क्र.३०/१, गणाधिश भोर लेक, टिळक चौक, कल्याण (प.)-४२१३०१, जिल्हा ठाणे.
फ्लॅट क्र.२, २रा मजला, निशिराज पॅलेस (गणाधिश), घर क्र.३०/१, गणाधिश भोर लेक, टिळक चौक, कल्याण (प.)-४२१३०१, जिल्हा ठाणे.
फ्लॅट क्र.३, ३रा मजला, निशिराज पॅलेस (गणाधिश), घर क्र.३०/१, गणाधिश भोर लेक, टिळक चौक, कल्याण (प.)-४२१३०१, जिल्हा ठाणे.
तांत्रिक अहवालानुसार चतुसिमा: उत्तरेस: कोहिनूर अपार्टमेंट; दक्षिणेस: मानस अपार्टमेंट; पुर्वेस: मल्हार कृपा अपार्टमेंट आणि आतील रस्ता; पश्चिमेस: अभिनव विद्यामंदिर.

सरफायसी कायदा २००२ च्या नियम ८(५) (६) व ९(१) अन्वये वैधानिक १५ दिवसांची विक्री सूचना

कर्जदार/तारणकर्ता/जामिनदार यांना येथे सुचित करण्यात येत आहे की, ई-लिलावाच्या तारखेपुर्वी अर्थात ०५.०५.२०२६ पुर्वी व्याजासह वर नमुद केलेली संपुर्ण रक्कम जमा करावी, अन्यथा मालमत्तेचा लिलाव/विक्री केली जाईल आणि उर्वरित रक्कम असल्यास ती व्याज व शुल्कासह वसुल केली जाईल. कोणतेही कारण न दर्शविता काही किंवा सर्व बोली नाकारण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्याकडे राखून आहे. ऑनलाईन लिलाव आमची तृतिय पक्षकार लिलाव संस्था श्रीराम ऑटोमॉल इंडिया लिमिटेड (समील) यांचे (https://eauctions.samil.in) वेबसाईटवर संचालित केले जाईल. विक्रीच्या सविस्तर नियम व अटीकरिता आणि निविदा सादर करण्याचे ठिकाण, निविदा उघडणे व लिलावाचे ठिकाण याकरिता कृपया https://eauctions.samil.in ला तसेच श्रीराम फायनान्स लिमिटेडच्या https://www.shriramfinance.in/auction वेबसाईटला भेट द्या.

ठिकाण: मुंबई
दिनांक: १५.०४.२०२६

सही/- प्राधिकृत अधिकारी
श्रीराम फायनान्स लिमिटेड